**सहनियंत्रक, वैधमापन शास्त्र, कोकण विभाग या कार्यालयांच्या दुरूस्ती,नुतनीकरण व विद्युत संच मांडणीसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.**

**<u>महाराष्ट्र शासन</u>**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : वैमाशा-२०२४/३६८/प्र.क्र.७२/ग्रा.सं.३**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २६ ऑक्टोबर, २०२६

<u>संदर्भ</u> - १) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२ दि.१७/०४/२०१५
२) नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.काजा (२८) /१४२४/प्र.क्र.३७० /वैमाशा-२/१०१२, दिनांक २४/१२/२०२४
३) कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांचे पत्र क्र. जा.क्र.साबांवि/पनवेल/प्रशा-१/७२३३, दिनांक २९/११/२०२४
४) वैमाशा-२०२४/३६८/प्र.क्र.७२/ग्रा.सं-३, दि. २१ /०२/२०२५, दि.२३ /१/ २०२६
५) नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. काजा(२८)/१४२५/प्र.क्र.३७० /वैमाशा-०२/५३९ , दि. १७/०६/२०२५ सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांचे दि. ०९/०९/२०२६ रोजीचे पत्र.

**<u>प्रस्तावना :-</u>**

या विभागाच्या संदर्भ क्र.४ येथील दि.२१/०२/२०२५ च्या शासन निर्णयान्वये सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोकण विभागीय कार्यालयाच्या दुरूस्ती व नुतनीकरणासाठी सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात रु. ३२,०९,९७६/- इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. त्यानुसार वित्त विभागास बीम्स प्रणालीवर निधी मुक्त करण्याबाबत प्रस्ताव सादर केले असता, वित्त विभागाने, दि. ३१ मार्च पूर्वी निधी खर्चाची खातरजमा करुन, चालू आर्थिक वर्षाकरीता निधीची मागणी करणे आवश्यक असल्याबाबत निर्देश दिले होते. त्यामुळे सन २०२४-२५ मध्ये तरतूद खर्ची पडली नाही. तद्नंतर या विभागाच्या संदर्भ क्र. ४ येथील दि.२३/०१/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात देखील अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी व निधी उपलब्ध करुन देण्यात आले असता,सदर कार्यालयाने आभासी वैयक्तिक ठेव लेखा खाते उघडलेले नसल्यामुळे निधी वितरीत करण्यात आले नाही. आता, सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांनी संदर्भ क्र. ५ येथील दि. ०९/०९/२०२६ च्या पत्रान्वये सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोकण विभागीय कार्यालयाच्या दुरूस्ती, नुतनीकरण व विद्युत संचासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक

बांधकाम विभाग, पनवेल यांनी सहनियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोकण विभागीय कार्यालयास दुरूस्ती व नुतनीकरणासाठी रु.३२,०९,९७६ /- तसेच विद्युत संचसाठी रु. ११,१३,११४/ असे एकूण रु. ४३,२३,०९०/ इतक्या रक्कमेच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी व निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनास विनंती केली आहे. त्यानुसार सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र कोकण विभागीय कार्यालयास रु. ४३,२३,०९०- इतक्या रक्कमेस सुधारीत अंधाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे व निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई यांनी सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोकण विभागीय कार्यालयाच्या दुरूस्ती व नुतनीकरणासाठी रु.३२,०९,९७६ /- तसेच विद्युत संचसाठी रु. ११,१३,११४/- असे एकूण रु. ४३,२३,०९०/ इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मंजुरी व निधी उपलब्ध करून देण्याकरीता शासनास सादर केले आहे. उपरोक्त रु.३२,०९,९७६ /- इतक्या रक्कमेचा अंदाजपत्रक उप विभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांनी सन २०२२-२३ च्या दरसुचीनुसार तयार केले असून सदर अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल विभाग व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रायगड, कोकण भवन, नवी मुंबई यांची तांत्रिक सहमती घेण्यात आलेली आहे. तसेच विद्युत संचसाठी रु. ११,१३,११४/- इतक्या रक्कमेचा अंदाजपत्रक अधीक्षक अभियंता, मुंबई प्रादेशिक (विद्युत) मंडळ सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी सन २०२२-२३ च्या दरसुचीनुसार तयार केले असून सदर अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता,(विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग, व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम, मुंबई प्रादेशकि (विद्युत) मंडळ सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांची तांत्रिक सहमती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार **सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोकण विभागीय कार्यालयास सादर केलेले अनुक्रमे दुरूस्ती व नुतनीकरणासाठी रु.३२,०९,९७६ /- तसेच विद्युत संचसाठी रु. ११,१३,११४/ असे एकूण रु. ४३,२३,०९०/-(रूपये त्रेचाळीस लाख तेवीस हजार नव्वद मात्र) इतक्या खर्चाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.**

२. उपरोक्त प्रयोजनार्थ या आदेशान्वये सन २०२६-२७ या वित्तीय वर्षामध्ये रूपये **४३,२३,०९०/-** इतका निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रयोजनार्थ सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोकण विभागीय कार्यालयातील उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत असून त्यांनी सदर निधी संबंधितांकडे हस्तांतरीत करावा.

३. उपरोक्त खर्च मागणी क्र. एम-५ मुख्य लेखाशिर्ष ५४७५, इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च १०२ नागरी पुरवठा (००) (०४) वजने व मापे मुलभूत सुविधांचे बळकटीकरण (कार्यक्रम) (५४७५-०३२८) ५३, मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. व तो सन २०२६-२७ या वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या, शासन दि.११ ऑगस्ट, २०२६ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८, भाग पहिला, उप विभाग- पाच, अ.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका, परिच्छेद क्र.१३४(१०) नुसार सर्व अटी व शर्तींची पूर्तता करुन प्रशासकीय विभागांस प्रदानित केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०२६१७३९०७३३०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.10.26 17:40:17 +05'30'

**(पूजा मानकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अ.ना.पु.व ग्रा.सं. विभाग, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर कार्यालयाच्या दुरूस्ती व नुतनीकरणाकरीता सदर निधी मुक्त करण्याबाबत वित्त विभागास तात्काळ प्रस्ताव सादर करण्यात यावा.
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल, कोकण भवन, नवी मुंबई.
४. महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
५. महालेखापाल-१, (लेखा व परीक्षा), मुंबई / नागपूर
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोकण विभाग, मुंबई
८. वित्त विभाग (विनियम), मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती, (ग्रा.सं.-३)